# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक १५९ वा ❑ भारतीय सौर दिनांक १५ श्रावण शके १९४८, गुरूवार दि.०६ ऑगस्ट २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


विशेष लेख...

## दुसऱ्यांचे अश्रू पुसणाऱ्या मनाच्या डॉक्टरांचा दुर्दैवी अंत

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

दुसऱ्यांच्या मनातील नैराश्य आणि मानसिक ताण दूर करणाऱ्या गाझियाबादमधील प्रख्यात मानसोपचार तज्ज्ञ डॉ. हेमिका अग्रवाल यांनी आपल्या राहत्या घरावरून उडी मारून आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. वयाच्या अवघ्या ४० व्या वर्षी त्यांनी घेतलेल्या या टोकाच्या पावलामुळे वैद्यकीय क्षेत्रात आणि परिसरात मोठी हळहळ व्यक्त होत आहे. ही दुर्दैवी घटना गाझियाबादमधील राज नगर एक्सटेन्शन भागातील ऑफिसर्स सिटी–२ सोसायटीमध्ये रविवार, २ ऑगस्ट २०२६ रोजी संध्याकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास घडली.

पोलीस आणि कौटुंबिक सूत्रांनी दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार, डॉ. हेमिका अग्रवाल यांचा सुमारे दीड वर्षांपूर्वी पतीसोबत घटस्फोट झाला होता. नाते तुटल्यामुळे त्या प्रचंड मानसिक तणावाखाली आणि नैराश्यात होत्या.

डॉ. हेमिका या गाझियाबादमधील अत्यंत प्रसिद्ध आणि ज्येष्ठ मानसोपचार तज्ज्ञ डॉ. आर. के. चंद्रा यांच्या कन्या होत्या. त्यांच्या कुटुंबाने आणि वडिलांनी त्यांना या मानसिक धक्क्यातून बाहेर काढण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले होते. मात्र, रविवारी संध्याकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास त्यांनी ऑफिसर्स सिटी–२ सोसायटीमधील आपल्या पाचव्या मजल्यावरील फ्लॅटच्या गॅलरीतून खाली उडी मारली. उंचीवरून पडल्यामुळे झालेल्या गंभीर दुखापतींमुळे त्यांचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी पाठवला आहे. घटनास्थळावरून कोणतीही सुसाईड नोट जप्त करण्यात आलेली नाही. डॉ. हेमिका यांच्या आत्महत्येप्रकरणी पोलीस सर्व बाजूंनी तपास करत असून, कुटुंबातील सदस्यांचे जबाब नोंदवण्याचे काम सुरू आहे.

इतरांच्या विस्कटलेल्या मनांना सावरणारे डॉक्टर स्वतःच डिप्रेशनचा बळी ठरल्यामुळे मानसिक आरोग्याचा प्रश्न किती गंभीर रूप धारण करू शकतो, हे या घटनेवरून पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. ही घटना मानवी मनाच्या एका अत्यंत संवेदनशील, गुंतागुंतीच्या आणि समाज म्हणून आपण अनेकदा दुर्लक्षित केलेल्या वास्तवावर थेट बोट ठेवते. जेव्हा इतरांच्या मनातील वैचारिक गोंधळ, भीती आणि नैराश्याचे निवारण करणारी एक तज्ज्ञ व्यक्ती स्वतःच त्या अंधाऱ्या डोहात हरवून जाते, तेव्हा ती केवळ एका व्यक्तीची किंवा कुटुंबाची शोकांतिका उरत नाही. ती संपूर्ण सामाजिक व्यवस्थेच्या, आपल्या विचारसरणीच्या आणि ढोंगी मानसिकतेच्या अपयशावर प्रकाश टाकते.

आपण अनेकदा बुद्धिजीवी, डॉक्टर, समुपदेशक किंवा समाजात अत्यंत यशस्वी असलेल्या व्यक्तींना अजिंक्य किंवा सुपरह्युमन समजण्याची घोडचूक करतो. त्यांच्याकडे इतरांचे अश्रू पुसण्याचे सामर्थ्य आहे म्हणजे त्यांना कधी रडूच येऊ शकत नाही, असा एक अवाजवी समज समाज स्वतःभोवती निर्माण करतो. पण या पांढऱ्या कोटाच्या आणि पदव्यांच्या मागेही एक सामान्य, हळवं आणि प्रसंगी खचू शकणारं मानवी मन असतं, हे आपण सोयीस्करपणे विसरतो.

मानसिक आजार, नैराश्य किंवा एकटेपणा हा कोणत्याही पदाचा, पैशाचा, सामाजिक प्रतिष्ठेचा किंवा अफाट ज्ञानाचा आदर करत नाही. उलट, ज्या व्यक्ती उच्च पदावर असतात, त्यांच्यावर स्वतःची एक यशस्वी आणि कणखर प्रतिमा समाजात टिकवून ठेवण्याचे प्रचंड दडपण असते. याच दडपणामुळे अनेकदा ही माणसे स्वतःच्या आत सुरू असलेल्या वादळाविषयी उघडपणे बोलू शकत नाहीत आणि आतल्या आत गुदमरत राहतात. अशा अत्यंत कठीण आणि भावनिक पडझडीच्या काळात, स्वतःभोवती असलेला प्रतिष्ठेचा आणि खोट्या स्वाभिमानाचा मुखवटा बाजूला ठेवून धीराने मदत मागणे, हे कधीही कमकुवतपणाचे लक्षण असू शकत नाही. उलट, स्वतःच्या मर्यादा स्वीकारून मदतीसाठी हात पुढे करणे हे जगण्याच्या अदम्य इच्छेचे आणि सर्वात मोठ्या धाडसाचे प्रतीक आहे.

डॉ. हेमिका यांच्या जाण्याने वैद्यकीय क्षेत्राला तर धक्का बसलाच आहे, पण समाजालाही एक गंभीर इशारा मिळाला आहे. जर आपण अजूनही मानसिक आरोग्याकडे एक टॅबू किंवा सामाजिक कलंक म्हणून पाहत राहिलो, आणि माणसाला त्याच्या हुद्द्यापलीकडे जाऊन एक माणूस म्हणून समजून घेणार नसू, तर भविष्यात अशा अनेक अमूल्य प्रतिभा केवळ एकाकीपणाच्या आणि समाज काय म्हणेल या भीतीच्या विळख्यात अडकून अकाली कोमेजून जातील. एकमेकांशी संवाद साधणे, मनातील दुःख उघडपणे व्यक्त करणे आणि संकटाच्या वेळी हक्काने कोणाचातरी आधार घेणे हाच या मानसिक कोंडीतून बाहेर पडण्याचा एकमेव मार्ग आहे, हाच अत्यंत मोलाचा आणि तितकाच वेदनादायी धडा या दुर्दैवी घटनेतून आपल्याला मिळतो.

# ध्येय, जिद्द आणि कठोर परिश्रमातूनच भारतीय सैन्यात यश मिळते–अजित बागल

## लोकमंगल हायस्कूल, नागेवाडी–कुशी येथे भारतीय सेनेतील विशेष कामगिरीबद्दल अजित सदाशिव बागल यांचा गौरव

ज्योतिर्मय साहित्य

सातारा – देशसेवा ही केवळ नोकरी नसून ती राष्ट्राप्रती असलेली सर्वोच्च बांधिलकी आहे. जीवनात निश्चित ध्येय, अखंड परिश्रम आणि संघर्षाची तयारी असेल, तर भारतीय सैन्यात यशस्वीपणे प्रवेश मिळविणे शक्य आहे, असा प्रेरणादायी संदेश भारतीय सेनेतील जवान अजित सदाशिव बागल यांनी विद्यार्थ्यांना दिला.

लोकमंगल ग्रुप शिक्षण संस्थेच्या लोकमंगल हायस्कूल, नागेवाडी–कुशी (ता. जि. सातारा) येथे भारतीय सेनेतील विशेष कामगिरीबद्दल अजित बागल यांच्या सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. सेवानिवृत्त सैनिक जनार्दन सावंत यांच्या हस्ते त्यांचा शाल, श्रीफळ व ग्रंथ देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमास लोकमंगल ग्रुप शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष शिरीष चिटणीस यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

सत्काराला उत्तर देताना अजित बागल यांनी आपल्या सैन्य प्रवासाचा अनुभव विद्यार्थ्यांसमोर मांडला. ते म्हणाले, ‘‘मी सन २०१८ मध्ये भारतीय सेनेत रुजू झालो. कोणत्याही क्षेत्रात यश मिळवायचे असेल, तर प्रथम मनात स्पष्ट ध्येय असणे आवश्यक आहे. ध्येयाशिवाय शिक्षणालाही दिशा मिळत नाही. संघर्षाशिवाय यश प्राप्त होत नाही. विशेषतः १९ ते २१ या वयोगटात सातत्यपूर्ण प्रयत्न, नियमित सराव आणि आत्मविश्वासाच्या बळावर भारतीय सैन्यात भरती होणे निश्चित शक्य आहे. प्रत्येक विद्यार्थ्याने आजपासूनच आपल्या भविष्याचे ध्येय निश्चित करून त्यासाठी मेहनत घेतली पाहिजे.‘‘




यावेळी मार्गदर्शन करताना सेवानिवृत्त सैनिक जनार्दन सावंत म्हणाले, ‘‘भारतीय सैन्य, हवाई दल किंवा अन्य संरक्षण दलात प्रवेश मिळविण्यासाठी केवळ इच्छा पुरेशी नसून त्यामागे ध्येय, शिस्त आणि योग्य तयारी आवश्यक आहे. बारावीनंतर एअर फोर्समध्ये प्रवेशाच्या विविध संधी उपलब्ध आहेत. जनरल नॉलेज, शारीरिक क्षमता आणि अभ्यास यांचा योग्य समन्वय साधला, तर एनडीएसारख्या प्रतिष्ठित परीक्षेतही यश मिळविता येते. दहावीमध्ये चांगले गुण मिळवून विद्यार्थ्यांनी आतापासूनच सैन्यभरतीची तयारी सुरू केली, तर त्यांना स्पर्धा परीक्षांमध्ये निश्चितच यश मिळेल.‘‘ कार्यक्रमाच्या अध्यक्षीय मार्गदर्शनात शिरीष चिटणीस म्हणाले, ‘‘विद्यार्थ्यांसमोर विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती आणण्यामागचा उद्देश हा त्यांच्या मनात मोठी स्वप्ने आणि उंच ध्येय निर्माण करणे हा आहे. अशा प्रेरणादायी व्यक्तींचे अनुभव विद्यार्थ्यांच्या जीवनाला दिशा देतात. त्याचबरोबर ग्रंथालयातील पुस्तकांचे नियमित वाचन विद्यार्थ्यांच्या विचारविश्वाला समृद्ध करून त्यांच्या ध्येयाला बळकटी देते. अजित सदाशिव बागल यांनी भारतीय सैन्यात उल्लेखनीय कार्य करून सातारा जिल्ह्याचे नाव अभिमानाने उंचावले आहे. विद्यार्थ्यांनी त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन स्वतःच्या आयुष्याला योग्य दिशा द्यावी.‘‘

पुढे बोलताना त्यांनी आजच्या सामाजिक परिस्थितीवर भाष्य करताना सांगितले की, ‘‘पूर्वीच्या एकत्र कुटुंब पद्धतीमुळे मुलांमध्ये आत्मविश्वास आणि मानसिक आधार अधिक होता. मात्र विभक्त कुटुंब पद्धती वाढत असल्याने अनेक विद्यार्थ्यांमध्ये नैराश्याची भावना निर्माण होताना दिसते. अशा परिस्थितीत चांगले वाचन, सकारात्मक विचार आणि प्रेरणादायी व्यक्तींचा सहवास विद्यार्थ्यांना मानसिक बळ देण्याचे महत्त्वाचे कार्य करतो.‘‘

या कार्यक्रमास मुख्याध्यापक शशिकांत जमदाडे, नितीनकुमार कसबे, प्रियंका शिंदे, बाळकृष्ण इंगळे, हणमंत खुडे, राहुल घोडके, रमेश महामुलकर, दत्तात्रय शिर्के यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन मुख्याध्यापक शशिकांत जमदाडे यांनी केले, तर आभार संगीता कुंभार यांनी मानले.

# परीक्षा : गुणपत्रिकेपलीकडील जीवनाची कसोटी (भाग २)

ज्योतिर्मय साहित्य

उद्योगक्षेत्रात कार्यरत असताना आणि नंतर गुणवत्ता व्यवस्थापन प्रणाली शिकविण्याची संधी मला अनेक वर्षे मिळाली. त्या वेळी विद्यार्थ्यांना, अभियंत्यांना आणि व्यवस्थापकांना मी एक सूत्र नेहमी सांगत असे,

‘‘ज्याच्याकडे आपण लक्षपूर्वक पाहत नाही, ते आपण मोजू शकत नाही; जे मोजता येत नाही, ते नियंत्रित करता येत नाही; आणि जे नियंत्रित करता येत नाही, त्यामध्ये सुधारणा घडवून आणता येत नाही.‘‘

आज मागे वळून पाहताना जाणवते की हे सूत्र केवळ उद्योगव्यवस्थापनापुरते मर्यादित नाही; ते जीवनालाही तितकेच लागू पडते. कोणत्याही प्रक्रियेची सुरुवात निरीक्षणाने होते. निरीक्षणातून माहिती मिळते. त्या माहितीचे परीक्षण केले की तिची विश्वासार्हता पडताळली जाते. त्यानंतर आवश्यक मापन केले जाते. मापनामुळे वस्तुस्थिती आकडेवारीच्या स्वरूपात स्पष्ट होते. त्या आकडेवारीचे विश्लेषण किंवा चिकित्सा केली की कारणे आणि परिणाम यांचा उलगडा होतो. त्यावर आधारित नियंत्रण करता येते आणि नियंत्रणामुळे सुधारणा शक्य होते. सातत्याने सुधारणा होत राहिली की उत्कृष्टता प्राप्त होते.

म्हणूनच ही संपूर्ण प्रक्रिया पुढील सूत्रात मांडता येईल:

निरीक्षण परीक्षण मापन विश्लेषण (चिकित्सा) नियंत्रण सुधारणा उत्कृष्टता

यामध्ये कोणताही टप्पा अनावश्यक नाही आणि कोणताही टप्पा वगळून पुढे जाता येत नाही.

ही प्रक्रिया केवळ उद्योगक्षेत्रापुरती मर्यादित नाही. शिक्षण, संशोधन, शेती, प्रशासन, न्यायव्यवस्था, कला, साहित्य, विज्ञान आणि आपल्या दैनंदिन जीवनातही हाच क्रम लागू पडतो. आपण अनेकदा वस्तुस्थिती समजून न घेता मत बनवतो, निष्कर्ष काढतो किंवा निर्णय घेतो. अशा वेळी चुका होण्याची शक्यता वाढते. परंतु निरीक्षण, परीक्षण आणि चिकित्सेची सवय लागली की निर्णय अधिक अचूक आणि परिणामकारक होतात.

भाषेतील शब्दांचाही अर्थ संदर्भानुसार बदलत असतो. उदाहरणार्थ, ‘‘कन्या निरीक्षण‘‘ हा शब्दप्रयोग आपल्या सामाजिक परंपरेत रूढ आहे. येथे ‘‘निरीक्षण‘‘ म्हणजे प्रयोगशाळेतील वैज्ञानिक परीक्षण नव्हे. तो परस्परांना समजून घेण्याचा, विचारांची देवाणघेवाण करण्याचा आणि भावी सहजीवनाचा विचार करण्याचा एक सामाजिक संस्कार आहे. म्हणून प्रत्येक शब्दाचा अर्थ त्याच्या संदर्भातूनच समजून घ्यावा लागतो.

वैद्यकीय क्षेत्रात मात्र निरीक्षण, परीक्षण, मापन आणि चिकित्सा या सर्व प्रक्रिया प्रत्यक्ष अनुभवास येतात. आयुर्वेदातील नाडीपरीक्षा हे त्याचे उत्कृष्ट उदाहरण आहे. अनुभवी वैद्य मनगटावरील नाडीचा वेग, लय, सातत्य आणि स्पंदनातील सूक्ष्म बदल यांचे निरीक्षण करतो. त्या निरीक्षणाचे परीक्षण करून शरीरातील वात, पित्त आणि कफ यांचे संतुलन किंवा असंतुलन समजून घेतो आणि त्यानुसार चिकित्सा निश्चित करतो.




आधुनिक वैद्यकशास्त्रातही मूलतत्त्व तेच आहे; फक्त साधने बदलली आहेत. स्टेथोस्कोप, रक्तदाबमापक, रक्ततपासण्या, क्ष–किरण, संगणकीय छेदनचित्रण (सीटी स्क्यान), चुंबकीय अनुनाद प्रतिमांकन एम आर आय), हृदयाचा विद्युत आलेख (इसीजी) किंवा मेंदूच्या विद्युत लहरींचा आलेख (ईईजी), ही सर्व उपकरणे शरीरातील बदलांचे निरीक्षण करतात, आवश्यक मापन करतात आणि त्या माहितीचे विश्लेषण करण्यासाठी चिकित्सकाला आधार देतात. उपकरणे निष्कर्ष देत नाहीत; ती माहिती देतात. योग्य निष्कर्ष काढण्यासाठी प्रशिक्षित बुद्धी, अनुभव आणि चिकित्सक दृष्टी आवश्यक असते.

म्हणूनच संस्कृतमधील एक सुभाषित येथे अत्यंत समर्पक वाटते,

विमृश्यकारिणं गुणलुब्धाः स्वयमेव सम्पदः।

म्हणजेच, जो विचारपूर्वक आणि चिकित्सक दृष्टीने कृती करतो, त्याच्याकडे यश आणि समृद्धी आपोआप आकर्षित होतात. खरे तर जीवनातील सर्वांत मोठी परीक्षा ही प्रश्नपत्रिकेत नसते; ती आपल्या निर्णयांमध्ये असते. प्रत्येक दिवस आपल्यासमोर नवे प्रश्न उभे करतो. त्यांची उत्तरे पाठ्यपुस्तकात नसतात. ती शोधावी लागतातनिरीक्षणातून, अनुभवातून, विचारातून आणि चिकित्सेतून.

विद्यार्थ्याला परीक्षा गुण मिळवून देते; परंतु जीवनातील परीक्षा माणसाला गुणी बनवते. शाळेची परीक्षा स्मरणशक्तीची कसोटी पाहते; जीवनाची परीक्षा चारित्र्य, संयम, प्रामाणिकपणा, विवेक आणि माणुसकीची परीक्षा घेते. गुणपत्रिका कपाटात जपली जाते; पण जीवनातील परीक्षांतून घडलेले व्यक्तिमत्त्व समाजाच्या स्मरणात राहते.

म्हणून परीक्षेला घाबरू नका. तिचे स्वागत करा. शांत राहा. सजग राहा. निरीक्षण करा. परीक्षण करा. मापन करा. चिकित्सक विचार करा. त्यानंतरच निर्णय घ्या, कारण,


निरीक्षणातून माहिती मिळते.
परीक्षणातून सत्य पडताळले जाते.
मापनातून वस्तुस्थिती स्पष्ट होते.
चिकित्सेतून विवेक विकसित होतो.
नियंत्रणातून शिस्त निर्माण होते.
सुधारणेतून उत्कृष्टता प्राप्त होते.
आणि म्हणूनच,


परीक्षा ही भीती निर्माण करणारी घटना नाही; ती आत्मपरीक्षण, आत्मविकास आणि उत्कृष्टतेकडे नेणारा जीवनाचा अखंड प्रवास आहे.

‘‘शाळेची परीक्षा आयुष्याचा एक भाग असते; परंतु आयुष्यच माणसाची सर्वांत मोठी परीक्षा असते.‘‘

परिक्षा संपली नाही. ती सुरूच राहणार, फक्त स्वरूप बदलत राहणार इतकेच.

संपूर्ण.




# जात्यावरच्या ओव्या......

चल चल मह्या जीवा
नको बसु एका जागी
आपन संसारी माणस
नही साधु,बैरागी ||७८०||

चल चल मह्या जीवा
आयत मिळणार कस?
काम करणारे हात
खाईन दोन घास ||७८१||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

# मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक–भाग ६०




ज्योतिर्मय साहित्य

**मना राम कल्पतरू कामधेनू ।**
**निधी सार चिंतामणी काय वानू ।**
**जयाचेनि योगे घडे सर्व सत्ता ।**
**तया साम्यता कायसी कोण आता ।।६०।।**

अर्थ : हे मना, राम म्हणजे भगवंत कल्पतरू, कामधेनू आहेत. ते निधी, सार, चिंतामणी... सारे सारे काही आहेत. हे सगळे शब्द त्यांचे वर्णन करण्यासाठी कमी पडतात की काय म्हणून समर्थ म्हणतात की त्यांचे कसे आणि काय वर्णन करू ? त्यांच्याच योगाने आणि सत्तेने सर्व काही घडत आहे. त्यांची तुलना किंवा साम्य कशाशी दाखवता येईल ?

( चिंतामणी – इच्छिलेली वस्तू देणारा, वानू – वर्णन करू )



विवेचन : या श्लोकात समर्थ श्रीरामांच्या भक्तीची महती आपल्याला सांगतात. श्रीरामांबद्दल बोलताना त्यांनी वेगवेगळी विशेषणे वापरली आहेत. श्रीराम कामधेनू, कल्पतरू, निधी सार, चिंतामणी सारे सारे काही आहेत असे समर्थ म्हणतात. या एकेक शब्दाचा अर्थ आपण लक्षात घेऊया.

कल्पतरू म्हणजे इच्छिलेले सर्व काही देणारा एक वृक्ष. त्याच्या छायेत बसून जी कल्पना करावी ते सर्व आपल्याला प्राप्त होते. कामधेनू म्हणजे इच्छिलेले सर्व काही देणारी दिव्य गोमाता. निधी म्हणजे कुबेराचे भांडार किंवा खजिना, चिंतामणी म्हणजे इच्छिलेले सर्व काही देणारा काल्पनिक मणी.

प्रभू रामचंद्र भक्तांचे सर्व मनोरथ पुरवणारे आहेत. ते कल्पतरू, कामधेनू आहेत. आपल्या भक्तांना काहीही कमी पडणार नाही याची काळजी ते घेतात. इच्छिलेले सर्व काही देणारे ते आहेत. ते निधी म्हणजे कुबेराचे भांडार आहेत. कुबेराचे भांडार म्हणजे समृद्ध खजिना! कशाचीही कमी नाही. म्हणजेच श्रीरामाच्या भक्तांना कसलीही कमी पडणार नाही. त्यानंतर समर्थ म्हणतात की ते सार आहेत. सार म्हणजे महत्त्वाचे तत्व ! या विश्वामध्ये सार म्हणजे फक्त एक श्रीराम. बाकी सर्व काही असार. एका वाक्यात सांगायचे झाले तर रामनाम ही सर्व कुलुपांची अशी एक किल्ली आहे की ज्यामुळे सर्व कुलुपे विनासायास उघडतात.

संत ज्ञानेश्वरांनी आपल्या पसायदानात परमेश्वराला प्रार्थना करताना म्हटले आहे, ''जो जे वांछील, तो ते लाहो.'' म्हणजे ज्याला ज्याला जी जी इच्छा होईल ती ती गोष्ट प्राप्त होवो. अर्थात या ठिकाणी इच्छा म्हणजे सदिच्छा किंवा चांगली इच्छा हे गृहीत आहे. भक्ताच्या चांगल्या इच्छाच भगवंत पुरवेल. आणि श्रीरामांच्या भक्तांना वाईट इच्छा कशी होईल ? म्हणून आपल्या भक्तांच्या मोक्षाच्या, दर्शनाच्या सर्व कामना तो दयानिधी पुरविल.

(क्रमशः)



# ॥ अभंग-माधव ॥

माधव मनोहर जोशी
दादर, मुंबई.
मो. 9833159630



## अंगोपांगी ईश्वर

सर्व मानवात । वसे भगवंत ।
सांगतात संत । पदोपदी ॥१॥
कुठे वसे कोण । पाहूया आपण ।
करूया नमन । संकलांना ॥२॥
हृदयस्थ राम । तोच आत्माराम ।
करूया प्रणाम । नित्य त्याला ॥३॥
करी वसे कृष्ण । शिकवी तो कर्म ।
कर्म हाच धर्म । ध्यानी ठेवा ॥४॥
पदी वसे विठू । शिकवी संयम ।
उभा तो कायम । युगे युगे ॥५॥
दोन नेत्री वसे । देव दत्त दृष्टि ।
त्याने पहा सृष्टी । ईश्वराची ॥६॥
मुखाने वदावे । ईश्वराचे नाम ।
मुखात कायम । तेच राहो ॥७॥
पडावे कर्णात । ईश गुणगान ।
ठेवा ह्याचे भान । निरंतर ॥८॥
चित्ती परमात्मा । नियंत्री तो आत्मा ।
बनवी सुखात्मा । आपल्याला ॥९॥
माधव हा म्हणे । आपले शरीर ।
म्हणजे ईश्वर । ऐसे माना ॥१०॥

# ॥ संजय उवाच... ॥




@संजय काव्या पुणे 7743918559

✍ हिशोब

एखाद्या वस्तूची किंवा कामाची केलेली मोजदाद म्हणजे हिशोब, हिशोब चोख असेल तर कोणत्याही अडचणी येत नाहीत पण हिशोबात गडबड असेल तर अडचणी सोडवणे कठीण होऊन बसते. माणसानी नेहमी हिशोबात रहावे.

(हे माझे मत आहे पटले तर घ्यावे)

# मीपणा ठेवून देवाकडे पाहणाऱ्यासस त्याची प्राप्ती होत नाही



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

देवाला आपण जाणू म्हणून तो जाणला जाईल का ? मला ब्रह्म कळले म्हणून शब्दाने सांगितले तर ब्रह्म कळले असे होत नाही. जो ब्रह्म कळले असे म्हणतो, त्याला खरे म्हणजे काहीच कळले नाही असे होते. ते कळून घेऊ म्हणून कळत नाही; ते न कळतच कळते, आणि मग ‘ मला कळले ’ ही भावनाच तिथे राहात नाही. मी ब्रह्माला ओळखीन असे म्हणून जो देवाजवळ गेला, त्याला काहीच प्राप्ती होणार नाही. मीपणाने जो देवाला पाहू जातो, त्याला देवाची प्राप्ती होत नाही. आपला अहंकारच देवाच्या प्राप्तीच्या आड येतो; आणि तो बरोबर घेऊनच जर आपण देवाला शोधू लागलो तर तो कसा सापडेल ? आपल्या आणि देवाच्यामध्ये आपल्या अहंकाराचा पातळ पडदा असतो, आणि तो असल्यामुळे आपल्याला देव दिसत नाही. तो दूर करा म्हणजे देव दिसू लागेल.

व्यापार चांगला चालला नाही म्हणजे मग विचारायला येता की, तुम्ही व्यापार करायला सांगितला पण चांगला चालत नाही; पण त्याचबरोबर नामस्मरण करायला सांगितले होते आणि ते करीत नाही, हे मात्र सांगायचे नाही ! नामस्मरण केल्याने व्यापारात बिघाड येईल का ? तुम्ही म्हणाल की, आमच्या संसारात तुम्ही बिघाड करायला सांगता; परंतु मी बिघाड करायला सांगत नसून, माझ्या सांगण्यावरून तुम्ही नामस्मरण केले तर उलट तो चांगलाच होईल. काळजी न करता संसार करा. रामाला जे करायचे, ते तुम्ही काही केले तरी करायला तो चुकत नाही. मग काळजी करून तरी काय होणार आहे ? जे भोगायचे ते कष्टाने भोगण्यापेक्षा आनंदाने भोगलेले काय वाईट ! जे जे आघात होतील ते त्याचे म्हणून त्याच्याकडे पाठवावेत. आपल्याला त्यांच्याशी कर्तव्य नाही असे समजत जावे. आपल्याला नवस करायचा असेल तर असा करावा की, '' मला तू ज्या स्थितीत ठेवशील त्या स्थितीत आनंद दे, म्हणजे मला समाधान राहील. दुसरे काही मागण्याची इच्छाच होऊ देऊ नको '' असे मागावे, म्हणजे आपल्याला त्याचे होऊन राहता येईल. मनुष्याची शांती बिघडायला जगामध्ये दोनच कारणे आहेत. एक म्हणजे आपल्याला हवे ते न येणे, आणि दुसरे म्हणजे आपल्याला नको ते येणे. या दोन्हीपैकी आपल्या हातामध्ये एकही नाही; मग आपण दुःख का करावे ? भगवंताच्या नामाची एकदा गोडी लागली ना, की सर्व काही साधते. नाम अभिमानाचा नाश करते. नामाने हवे–नको–पणाची बुद्धी होत नाही. साधुसंतांनी आवर्जून सांगितलेले हेच नाम तुम्ही सतत घेऊन समाधानाचा शाश्वत ठेवा मिळवा.

भगवंताजवळ असे काही मागा, की पुन्हा दुसरे काही हवेसेच वाटणार नाही.

# ॥ अध्यात्म ॥

मधुकर बोरीकर, पुणे

## संत श्रेष्ठ जनाबाई यांचा अभंग धरिला पंढरीचा चोर

पुढे

नासाग्रीचा वारा /जातसे अंगुलिया बारा/ तो गचिये धरुनी माघारा आत घाली//

ज्या वेळेला आपला प्राण खाली वाहतो, त्या वेळेला आपण प्रवृत्ती मार्गात राहतो. प्रवृत्ती मार्गात आपण येथील भौतिक विषय, वस्तू व व्यक्ती यांच्या बाबतीत ममता बाळगतो. ही माया असल्याकारणाने आपल्याला ही अशाच रीतीने या जगात बांधून ठेवल्या जाते. आणि आपण परमात्म्यापासून विन्मुख राहतो. हा बाहेर जास्त वाहणारा प्राण कमी कमी बाहेर वहावा आणि आत वरच्या बाजूने जास्त जावा, असे अपेक्षित आहे. इथे वरची बाजू म्हणजे मुलाधार चक्रापासून सुशुमना नावाच्या नाडीतून हा प्राण व आपल्या कंठाशी असलेला अपान,आपल्या बेंबी पाशी असलेला समान व सर्व शरीरात व्याप्त व्यान हे एकत्रितपणे वर मस्तकाकडे जातात, याला प्राण वायू वर सरकणे किंवा उर्ध्व रेता असे म्हणतात.हे पंच प्राण एकत्रीत आले की अग्नी भडकतो त्यास योगग्नी किंवा ब्रमग्नी म्हणतात.(आपण देवाला नैवेद्य दाखवताना प्राणाय स्व: अपानायस्वः व्यानाय स्व: उदानायस्वः समानायस्व: ब्रह्मणे नम: असे म्हणतो.केवळ संकल्प करून हे पाचही अग्नी ची आहुती जठरात द्यायची. (क्रमशः)

# सुख दुःखाचे तरंग माणसा-माणसाचे



✍वसंत कुलकर्णी,
छ.संभाजीनगर,
मो. 96730 67194

## सनातन हिंदू धर्म व आम्ही

आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळून पुढच्या वर्षी 2027 मधे 80 वर्ष पूर्ण होतील. स्वातंत्र्यपूर्वी देशात दोन युद्धे घडली. देश दिडसे वर्षे गुलामीत होता. त्यामुळे परकीय मानसिकता झुगारून देऊन आपण 1950 नंतर आपले प्रजासत्ताक भारत निर्माण केले! आज आपण जगात जागतिक महासत्ता झालो. इंग्रजानी त्यांच्या सोयीसाठी त्यांची संस्कृती, नियम वगैरे लाधली.. परंतु काही ठिकाणी अजूनही छाप दिसतेच त्यासाठी "सनातन हिंदूधर्म" संस्कृती आपण 100%अंगिकारली पाहिजे त्यासाठी प्रत्येकाने इग्रंजी संकल्पना टाकून, त्याज्य करून आपल्या हिंदू संस्कृतीच्या परंपरा मनामनात ठसविल्या पाहिजेत, असे मला वाटते. अयोद्येत भव्य राममंदिर व स्थापना केलीच आहे तसेच आपल्या परंपरा व अनादि काळापासून चालत आलेली संतपरपरा हा पाया आहे! आपली शिकवण म्हणजे पसायदान; वैश्विक सुख; शांती बंधूभाव ही खरी पूजा. हिंदूधर्म अनाचार, स्वैराचार आणि असभ्यतेची शिकवन कधीदेत नाही, याचे कारण हेच आहे की, हिंदू धर्म केवल सीमित वर्गासाठी विचार न करता सकल विश्वातील मानवतेचा व प्रगतिचा विचार करतो ! तर "आधी आपण करावे मग इतरांना सांगावे" अशा विचाराची साखळी तयार करू या.. मीच प्रारंभ करेन. सुप्रभात मीच म्हणेन अशी प्रतिज्ञा करू या. येथे थांबतो आपण वाचत राहा सुख दुःखाचे तरंग, गूडडे गूड मार्निग आपला दिवस आनंदी जावो हिच गुरू चरणी प्रार्थना.

# ॥ श्री दत्त महिमा ॥



लेखन सेवा - योगीराज (नितीन) डोळे
आद्यपीठ वरद दत्त संस्थान
श्री क्षेत्र राक्षसभुवन ता.गेवराई जि. बीड



# अन्नपूर्णे सदा पूर्ण शंकर प्राण वल्लभे....

ज्योतिर्मय साहित्य

मागील पाच लेखांमध्ये आपण दत्त महाराज आणि दत्त संप्रदायाची माहिती पाहत आहोत आणि आज एकदम अन्नपूर्णे सदापूर्णे असे अचानक काय झाले असा प्रश्न बहुतेकांना पडला असेल असो...

दत्त तिथे अन्नपूर्णा अशी प्रथा परंपरा दत्त संप्रदायात आहेच कारण अन्नपूर्णा माता अर्थात जगन्माता पार्वती.

खरेच जगाची माता म्हणून पार्वतीस मान आहेच हिंदू धर्मातील तीर्थयात्रा म्हटले की संपूर्ण भारतातील चार धाम, सप्तपुऱ्या बारा ज्योतिर्लिंग आदी स्मरतात मात्र काशी क्षेत्राचे नाव व यात्रा केल्याशिवाय यात्रामहात्म पूर्ण होत नाही याच काशी नगरीत विश्वनाथ आणि अन्नपूर्णा माता यांचे स्थान विशेष आहे

आद्य शंकराचार्यांनी रचलेले अन्नपूर्णा स्तोत्र ज्यात त्यांनी म्हटले आहे

प्रालेयाश्यल वंश पावन करी काशीपुरारेश्वरी

भिक्षान्नदेही कृपावलंबन करी माता न पूर्णेश्वरी

अर्थात काशीपुराची मालकीण म्हणून माता अन्नपूर्णा आहे अन्नपूर्णा माता म्हटले की नजरेसमोर येते ती पद्मासनात बसलेली एका हातामध्ये अमृत पात्र व



दुसऱ्या हातात अमृत प्रदान करण्यासाठी मोठी पळी अशी मूर्ती प्रचलित आहे अशी विलोभनीय मूर्ती काशी नगरीमध्ये आहे मात्र आद्यपीठ वरददत्त संस्थान मधील अन्नपूर्णेची मूर्ती जगा वेगळी आहे कारण ती या स्थानी सगुण रूपात मूळ स्वरूपात प्रगट झालेली आहे म्हणून अष्टभुजा रुपात आहे तिच्या पायाखाली महिषासुर देखील आहे ती सशस्त्र स्वरुपात आहे, त्या मागची कथा अशी आहे की दत्त महाराज नेहमी भ्रमण करीत असतात त्यांचा त्रिखंडात संचार असतो त्यांचे एकाच स्थळी राहणे अशक्यच म्हणून त्यांचे वर अनुसया मातेनंतर मातृवत प्रेम करणारी जगन्नमाता पर्वती हिने अन्नपूर्णा स्वरूपात दत्त महाराजांची नित्य भोजनाची व्यवस्था करणार असा शब्द दिला आहे म्हणून दत्त तेथे अन्नपूर्णा अशी संकल्पना आजही प्रचलित आहे

या स्थानी या दोन्ही देवतांचा निवास आहे संस्थानच्या कुलाचार प्रथेप्रमाणे बाराही महिन्याच्या पौर्णिमा तिथीला पुरणाचा महानैवैद्य अर्पण करून कुलाचार साजरा केला जातो माता अन्नपूर्णे कडे दत्त महाराज भिक्षा मागतात अर्थात जोगवा स्वरूपात ही भिक्षा असते या संस्थानचे गादीवरील महाराज भिक्षा मागतात व अन्नपूर्णा माता ती भिक्षा वाढत असते यावेळी सर्व स्त्री देवता अर्थात सर्व देवी यांच्या नामघोषात भिक्षा जोगवा मागितला जातो त्यावेळी महाकाली महालक्ष्मी महासरस्वती टेंभुरगड निवासिनी माहूरगड निवासिनी तुझा भुतिया जोगवा असा नाम घोष करून मगच अन्नदान केले जाते अर्थात जोगवा म्हणजे मला जगवा या अर्थाने ही परंपरा आजही या मठामध्ये पालन केली जाते.

असा संबंध आहे दत्त संप्रदाय आणि अन्नपूर्णा मातेचा म्हणून हा लेखन प्रपंच यापुढील माहिती आगामी लेखात घेऊया

गुरुदेव दत्त कृपा करा.

# प्रभातपुष्प

## षटकोळी माझी

संध्याराणी जयहिंद कोल्हे {काव्यसंध्या}
कळंब जि.धाराशिव मो. 87885 91371

## भावपुष्प

शब्दा शब्दांची अलवार
सुंदर,छान माळेत
भावपुष्प मनातले गुंफते
साधी सोपी रचना
शब्द मऊ मखमली
वाचताना मन आनंदते

हळव्या,कोमल मनाने
नित्य नियमाने देवास
भावपुष्प अर्पण करते
चरणी डोके ठेवून
नतमस्तक उभे राहूनी
मनोभावे प्रभूस वंदिते

# प्राचार्य विलास वाळुंजकरांनी विद्यार्थ्यांना जीवन जगण्याचे धडे दिले - विठ्ठल बरसमवाड




**ज्योतिर्मय साहित्य**

अहिल्यानगर - महात्मा गांधी विद्यालय येळीचे प्राचार्य विलास मुरलीधर वाळुंजकर हे वयोमानानुसार दिनांक ३१ जुलै २०२६ रोजी शुक्रवारी सेवानिवृत्त झाले. आयुष्यभर विद्यार्थ्यांना ज्ञान देण्यात इतके मग्न झाले की, सेवानिवृत्ती कधी आली. हे त्यांना कळलेच नाही. विद्यार्थी प्रिय प्राध्यापक ते प्राचार्य म्हणून त्यांचा कार्यकाल न्यू आर्ट्स कॉलेज पारनेर ,शेवगाव,अहिल्या नगर येथे चांगला गेला. म्हणूनच त्यांनी विद्यार्थ्यांना जीवन जगण्याचे धडे दिले. असे प्रतिपादन प्रसिद्ध साहित्यिक विठ्ठल बरसमवाड यांनी केले. पुणे येथे अनेक वर्ष प्रमुख नियमाक म्हणून त्यांनी कार्य केले अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या विविध समित्यांमधून मार्गदर्शनपर कार्य करण्यात त्यांचा हातखंडा होता. वेगवेगळ्या स्पर्धा परीक्षेमधून त्यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. त्यामुळे त्यांचे विद्यार्थी आज देशाच्या कानाकोपऱ्यामध्ये सेवा बजावत आहेत. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून न्यू आर्ट्स कॉलेजचे पर्यवेक्षक प्रा. जाजगे सर प्रमुख अतिथी प्रा. गोरे सर, देवढे सर उपस्थित होते. प्राचार्य विलास वाळुंजकर सरांच्या सुविद्य पत्नी नीता मॅडमनी ही सरांबद्दल गौरव उद्गार काढले. अध्यक्षीय भाषणातून जाजगे सरांनी त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा आढावा घेतला. ३५ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर वयोमानानुसार ते सेवानिवृत्त झाले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक श्री रामनाथ दुधलमल,श्री अर्जुन गायकवाड, श्री राजेंद्र हंडाळ, शिक्षकेत्तर कर्मचारी श्री शेलार पोपट श्री ढोले प्रदीप, अभियंते हर्षवर्धन वाळूंजकर, कराड अर्चना ,तळेकर अनिता व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री विजयकुमार चव्हाण यांनी केले तर आभार सिकंदर शेख यांनी मानले.



# क्रांतिसिंह नाना पाटील जयंती निमित्त राजीव गांधी महाविद्यालयात व्याख्यान संपन्न

**ज्योतिर्मय साहित्य**

करमाड - राजीव गांधी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील इतिहास विभागाच्या वतीने दिनांक ३ ऑगस्ट २०२६ रोजी क्रांतीसिंह नाना पाटील जयंती निमित्त विशेष व्याख्यान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून लोकप्रशासन विभागाचे डॉक्टर ज्ञानेश्वर कोठुळे आमंत्रित होते कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सदाशिव एस. मुळे होते.

क्रांतिसिंह नाना पाटील यांचे जीवन चरित्र या विषयावर आपले विचार व्यक्त करताना डॉ. कोठुळे सरांनी नाना पाटील यांनी सातारा सांगली परिसरातील जवळपास दीड हजार गावांमधून प्रति सरकारच्या माध्यमातून ब्रिटिश शासनाला समांतर असे शासन चालवले १९४२ ते १९४६ या काळात भूमिगत राहून क्रांतिसिंहांनी लोकन्यायालय बाजारपेठांची उपलब्धता, अन्नधान्य पुरवठा केंद्र इत्यादी द्वारे प्रभावी कार्य केले. स्वतंत्र सैन्य दल स्थापन करून ब्रिटिशांविरोधात क्रांती लढा तीव्र केला त्याचबरोबर गावगुंडांचा पाळेगारांचा बंदोबस्त ही केला असे सांगितले.

अध्यक्ष समारोप करताना प्राचार्य मुळे सरांनी स्वातंत्र्योत्तर काळात क्रांतीसिंहांनी प्रत्यक्ष राजकारणात सहभाग घेऊन दोन वेळा खासदार पद भूषवून संसदेत मराठी भाषेचा आवाज बुलंद केल्याचे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इतिहास विभाग प्रमुख प्रा. मनोज देवकर यांनी केले. आभार प्रदर्शन प्राध्यापक डॉ. योगेश शिंदे यांनी केले. याप्रसंगी रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. बाळासाहेब लिहिणार मंचावर उपस्थित होते. कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राज्यात ''एसआयआर''ला पुन्हा मुदत वाढ का? - धोंडीरामसिंह राजपूत

**ज्योतिर्मय साहित्य**

राज्यात सुरू असलेल्या मतदार फेरपडताळणी (एसआय आर) प्रक्रियेची मुदत ३१जुलै होती.ती वाढवून ०८ऑगस्ट करण्यात आली व आता पुन्हा निवडणूक आयोगाने ती वाढवून १७ ऑगस्ट करण्यात आली, असे का? याविषयीची विविध कारणे सांगण्यात येत आहे,मात्र जे प्रगणक आहेत,

ते एका ठिकाणी बसून पडताळणी करत आहेत, त्यांनी घरोघरी जाऊन पडताळणी करावयास पाहिजे तसे न करता ते घरी बसून किंवा कुठे तरी एका ठिकाणी बसून पडताळणी करतांना दिसत आहेत.त्यामुळे काही ठिकाणी साठ टक्के तर काही ठिकाणी ऐंशी टक्केच पडताळणी काम झालेले आहे.बऱ्याच ठिकाणी मतदारांचा अत्यल्प प्रतिसाद मिळत आहे.याचे कारण ''बीएलओ''चा निष्काळजीपणा आहे.काही प्रगणक विनाकारण मतदारांकडून नको त्या कागद पत्राची मागणी करीत आहेत.त्यामुळे मतदार पडताळणी करण्यास जात नाहीत.

''बीएलओ'' म्हणजे प्रगणक यांनी घरोघरी जाऊन मतदार फेरपडताळणी करावी असे आदेश असताना ते जर एका ठराविक ठिकाणी बसून मतदारांची माहिती मागवित असतील तर हे काम १७ ऑगस्ट पर्यंत ही पूर्ण होणार नाही. पुन्हा मुदत वाढवावी लागेल. शासनाच्या संबंधित अधिकाऱ्यांनी आपल्या अधिकारातील

''बीएलओ ''यांना मतदारांच्या घरोघरी जाण्याचे आदेश द्यावेत व त्यांच्या दररोजच्या कामाचा आढावा घ्यावा


तसेच संबंधित ''बीएलओ'' यांच्या कामात कुचराई दिसत असेल तर अशांना कामावरून तत्काळ कमी करून दुसऱ्याला पदभार देण्यात यावा.त्यांच्या अखत्यारीतील एकही मतदार फेरतपासणी पासून वंचित राहणार नाही याची खबरदारी घ्यावी ही त्या विभागाच्या वरिष्ठ अधिकारी वर्गाची जबाबदारी होय.

# कवी तथा समीक्षक प्रा.वा. ना.आंधळे यांच्या कवितांवर प्रा.आत्माराम चिमकर यांनी केली पीएच.डी

**ज्योतिर्मय साहित्य**

एरंडोल : येथील सुप्रसिद्ध कवी, समीक्षक तथा अनुवादक प्रा.वा. ना.आंधळे यांच्या कवितांवर एरंडोल येथील डी. डी.एस.पी.कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयातील मराठी विभाग प्रमुख प्रा.ए.टी तथा आत्माराम चिमकर यांनी पीएच.डी केली असून नुकतेच कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने त्यांच्या प्रबंधास मान्यता देत गौरविलेय.

प्रा.चिमकर यांनी कवी वा.ना.आंधळे यांच्या कवितेचा अभ्यास हा संशोधनाचा विषय घेऊन ३९४ पानी संशोधन वयाच्या एकोणसाठाव्या वर्षी मोठ्या जिद्दीने केलेय. अनेक मराठी चर्चासत्र,मराठी कार्यशाळांमधून त्यांनी अनेकविध मराठी साहित्यावर शोध निबंध राज्यस्तरावर, राष्ट्रीय स्तरावर, आंतरराष्ट्रीय स्तरावर यापूर्वी सादर केले असून अभ्यासू अध्यापक तथा विद्यार्थीप्रिय प्राध्यापक म्हणूनही ते ख्यातकीर्त आहेत. त्यांच्या या सुयशाचे अभिनंदन महाविद्यालयाचे अध्यक्ष माननीय श्री.अमित दादा पाटील यांनी शाल व पुष्प गुच्छ देऊन केले.त्यावेळी महाविद्यालयीन स्टाफनेही त्यांचेवर अभिनंदनाचा वर्षाव केला. याबरोबरच शैक्षणिक,सामाजिक परिघात त्यांचे कौतुक व अभिनंदन होत आहे.



प्रा.चिमकर यांना याच महाविद्यालयातील डॉ.सचिन पाटील (क.ब.चौ.उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,मराठी अभ्यास मंडळ सदस्य) यांनी संशोधनाकामी मार्गदर्शन केले.माझ्या जन्मभूमी व कर्मभूमी असलेल्या खान्देशाच्या साहित्यावर व साहित्यिकावर मला यशस्वी संशोधन करता आले.ही कृतज्ञता व्यक्त करणाऱ्या प्रा.चिमकर यांची शिक्षक म्हणून, संशोधक म्हणून उदात्त व व्यापक भूमिका निश्चितच अभिनंदनीय आहे.

# डॉ. सुधीर अग्रवाल महाराष्ट्र लोकनायक पुरस्काराने सन्मानित


**ज्योतिर्मय साहित्य**



लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या जयंतीनिमित्त दैनिक लोक युवा या वृत्तपत्राच्या वर्धापनदिनाच्या औचित्य साधून संत गजानन महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या नगरीत प्रा डॉ सुधीर नरसिंगदास अग्रवाल यांना सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल महाराष्ट्र लोकनायक पुरस्काराने शाल, श्रीफळ, प्रशस्ती पत्र व सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. प्रा डॉ सुधीर अग्रवाल हे मागील वीस वर्षांपासून वृत्तपत्राच्या माध्यमातून लोकजागृती, समाज प्रबोधन आणि अन्याय निवारणाचे कार्य करत आहे.

पुरस्कार समारंभाच्या अध्यक्षस्थानी धनश्रीताई काटीकर पाटील महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष हिंदी मराठी पत्रकार संघ हे होते. कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून विजय कुळकर्णी ज्येष्ट पत्रकार तथा जिल्हा प्रतिनिधी तरुण भारत, चंद्रकांत घोराडे शहर अध्यक्ष भाजप, बाळासाहेब दामोदर उद्द्योजक, हे होते. पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन संत गजानन महाराज अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या परिसरातील श्री स्वामी रामदास क्रीडा मंदिर परिसरातील स्वाध्याय कक्षात दिनांक २ ऑगस्ट २०२६ रोजी आयोजित करण्यात आला. दैनिक लोक युवा या वृत्तपत्राच्या वर्धापनदिनाच्या औचित्य साधून दरवर्षी महाराष्ट्र लोकनायक पुरस्काराचे आयोजन केले जाते. या कार्यक्रमात सामाजिक,शैक्षणिक, विधी,पत्रकारिता, आरोग्य, वैद्यकीय, प्रशासकीय सेवा,उद्योग,बालकल्याण अशा विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्यांचा सत्कार देखील करण्यात आला.






## महावस्त्र नात्यांचं : महावस्त्राचे पदर...

विश्वास देशपांडे, चाळीसगाव, प्रतिक्रियेसाठी : ९४०३७४९९३२

### 'मामा' (माहेरचा समृद्ध दुवा)

पुढे......

एका बाजूला स्वतःच्याच बहिणीच्या अपत्यांची निर्दयपणे हत्या करणारा आणि श्रीकृष्णाला मारण्यासाठी कपट-कारस्थाने रचणारा दुष्ट कंस मामा, तसेच भाच्यांना कपटाने युद्धाच्या गर्तेत लोटणारा कारस्थानी शकुनी मामा यांसारख्या कुप्रसिद्ध प्रवृत्ती होत्या; तर दुसऱ्या बाजूला श्रीकृष्णाचे अर्जुनाच्या आणि पांडवांच्या पाठीशी असलेले खंबीर मार्गदर्शकाचे नातं होते. कृष्णाने भाच्यांवर म्हणजे अभिमन्यूवर केलेले प्रेम आणि दाखवलेला धर्ममार्ग आजही नात्यांचा आदर्श मानला जातो.

मुलगी लग्न होऊन दुसऱ्या घरी जाते, तेव्हा तिच्या माहेरची खरी ताकद आणि आधार तिचा भाऊ आणि वहिनी असतात.

बहिणीच्या सुख-दुःखात खंबीरपणे पाठीशी उभा राहणारा, तिच्या मुलांच्या लग्नसमारंभात किंवा शुभकार्यात 'माहेरचा मान' म्हणून आस्थेने पुढाकार घेणारा मामा कुटुंबातील नात्यांची वीण अधिक घट्ट करत असतो.

कधी कधी आपले काम साधून घेण्यासाठी लोक एखाद्याला 'मामा' म्हणतात, त्यावरूनच बहुधा 'कामापुरता मामा' ही म्हण आली असावी. पण खरा मामा हा कामापुरता कधीच नसतो! तो कायमच आपल्या नात्याचं भान आणि जबाबदारी सांभाळत असतो. बहिणीकडे सगळ्या कार्यक्रमात तो हक्काने राबत असतो—अगदी पु. ल. देशपांडे यांच्या कथेतील 'नारायण'सारखा! त्याच्या उपस्थितीशिवाय कोणताही कार्यक्रम पूर्ण होऊच शकत नाही. (क्रमशः)

## कृतज्ञ मी कृतार्थ मी भगवंत हृदयस्थ आहे

© अपर्णा परांजपे कात्रज पुणे मो.95030 45495



### आतुरता श्रावणाची

पुढे.....

भगवान श्रीकृष्ण भगवद्गीतेत म्हणतात

भक्त्या मामभिजानाति यावान्यश्चास्मि तत्त्वतः।
ततो मां तत्त्वतो ज्ञात्वा विशते तदनन्तरम्॥ (गीता १८.५५) (क्रमश )

अर्थ : केवळ भक्तीच्या माध्यमातूनच माझे तत्त्वस्वरूप जाणता येते. आणि मला तत्त्वतः जाणल्यानंतर भक्त माझ्या परमधामाला प्राप्त होतो.

तसेच श्रीमद्भागवत मध्येही प्रेमभक्तीचे सर्वोच्च महत्त्व वर्णिले आहे—

स वै पुंसां परो धर्मो यतो भक्तिरधोक्षजे।
अहैतुक्यप्रतिहता ययात्मा सुप्रसीदति॥

अर्थ : मनुष्याचा सर्वोच्च धर्म तोच आहे, ज्यामुळे भगवानाविषयी निष्काम, अखंड आणि अहैतुकी भक्ती निर्माण होते. अशा भक्तीनेच आत्म्याला खरे समाधान प्राप्त होते.

अशा प्रकारे भगवान शिव आपल्या भक्ताला टप्प्याटप्प्याने त्या सर्वोच्च आध्यात्मिक शिखरापर्यंत घेऊन जातात, जिथे भगवंताविषयीचे निष्कलुष, निरपेक्ष प्रेमच उरते.

भगवान शिव प्रसन्न झाल्यावर ते काय देतात?

सनातन धर्मात भगवान शिवांना "आशुतोष" म्हटले जाते—अत्यल्प उपासनेनेही प्रसन्न होणारे देव. ते भक्तांच्या इच्छा पूर्ण करणारे, संकटांचा नाश करणारे, ज्ञान देणारे आणि मोक्षदाते आहेत. परंतु शास्त्रांचा सखोल अभ्यास केल्यास एक अत्यंत सूक्ष्म सत्य समोर येते—भगवान शिवांची सर्वोच्च कृपा म्हणजे भक्ताला भगवंताच्या चरणी अखंड भक्ती प्राप्त करून देणे.

१. वेदांतील रुद्र – मोक्षमार्गाचे अधिष्ठाता

यजुर्वेद (श्रीरुद्रम) मध्ये रुद्रांना विश्वाचे कल्याण करणारे, पापांचा नाश करणारे आणि मुक्तीकडे नेणारे ईश्वर म्हणून वंदन केले आहे.

नमः शिवाय च शिवतराय च। (तैत्तिरीय संहिता ४.५.८)

अर्थ : मंगलस्वरूप शिवांना आणि सर्वश्रेष्ठ कल्याणमूर्ती परमशिवांना नमस्कार.येथे "शिव" म्हणजे केवळ एक देवता नव्हे, तर कल्याणस्वरूप परमचैतन्य असा अर्थही अभिप्रेत आहे. (क्रमशः)

## विचार ते विजय

लेखक - अमोल बोरीकर.मो. 86240 03013



### स्वतःवर विश्वास ठेवणं इतकं कठीण का झालं?

पुढे.....

लक्षात ठेवा, बीज जमिनीत पुरलं जातं म्हणून त्याचं अस्तित्व संपत नाही. उलट अंधारातच त्याची मुळं मजबूत होतात. नदीला प्रत्येक वळणावर दगड भेटतात, तरी ती समुद्रापर्यंत पोहोचणं सोडत नाही. सूर्योदय प्रत्येक सकाळी होतो, कारण सूर्याला स्वतःच्या प्रकाशावर विश्वास असतो.

माणसाचंही तसंच आहे. तुमच्याकडे आज अपयश असू शकतं, अडचणी असू शकतात, लोकांची टीका असू शकते; पण जोपर्यंत तुमच्याकडे स्वतःवर विश्वास आहे, तोपर्यंत तुमचं भविष्य जिवंत आहे. स्वतःवर विश्वास वाढवण्यासाठी मोठे चमत्कार करण्याची गरज नाही. रोज स्वतःला दिलेला एक शब्द पाळा. एखादं छोटं ध्येय पूर्ण करा. नवीन काहीतरी शिका. आपल्या चुकांची जबाबदारी घ्या. स्वतःची तुलना दुसऱ्यांशी न करता कालच्या स्वतःशी करा. प्रत्येक छोटा विजय आत्मविश्वासाची एक नवी वीट रचत असतो.

लक्षात ठेवा, आत्मविश्वास म्हणजे "मी कधीच अपयशी होणार नाही" हा अहंकार नाही; तर अपयश आलं तरी मी पुन्हा उभा राहीन" हा दृढ विश्वास आहे.

रोज सकाळी आरशात पाहून स्वतःच्या डोळ्यात डोळे घालून सांगा– "जग काहीही म्हणो, माझा माझ्या प्रयत्नांवर आणि माझ्या अस्तित्वावर पूर्ण विश्वास आहे!"

जेव्हा तुम्ही जगाची मान्यता मागणे बंद करून स्वतःच्या क्षमतेवर विश्वास ठेवायला लागाल, तोच तुमचा खरा 'विजय' असेल! हा विजय तुम्हाला जगातल्या कोणत्याही सर्टिफिकेट किंवा मेडलपेक्षा खूप मोठी शांती देईल. जेव्हा तुम्ही स्वतःवर विश्वास ठेवायला लागता, तेव्हा जगाचा अविश्वास आपोआप गळून पडतो. वादळे कितीही मोठी आली, तरी ज्याचा स्वतःवर विश्वास असतो, तो कधीच कोलमडत नाही. दुसऱ्याच्या टाळ्यांच्या गजराची वाट पाहण्यापेक्षा, स्वतःच्या पाठीवर कौतुकाची थाप मारायला शिका. आत्मविश्वासाची हीच छोटीशी ज्योत तुम्हाला महाविजयाकडे घेऊन जाईल... आणि हाच 'विचार ते विजय' या प्रवासाचा खरा मंत्र आहे!

# संवाद हरवला आहे

**ज्योतिर्मय साहित्य**

सध्या शहरीकरण वाढल्याने बऱ्याच ठिकाण, जास्तीत जास्त फ्लॅट संस्कृती रुजली आहे. या फ्लॅट संस्कृतीत प्रत्येकाने आपल्या फ्लॅटचे दार लावून घरातच बसायचे, अशी जणू पद्धतच झाली आहे.त्यामुळे बऱ्याच जणांना आणि एकटं वाटत असावं, तसेच मलाही एकटं वाटायला लागतं.

घरातील प्रत्येक जण कामासाठी बाहेर जातात आणि मी गृहिणी, म्हणून दिवसभर घरात एकटी असल्याने कंटाळा येतो.

कोणी गप्पा मारायला असेल? तर मज्जा येते. चारच्या फक्कड चहा सोबत बिस्कीट आणि एक खास मैत्रीण काय सुख असतं हो! जाम भारी वाटतं.बोलणं, हसणं, प्लॅन बनवणे, सुख दु:खाच्या गोष्टी करणं, एकदम मूडच बदलतो नाही का?

आजकाल हे फारच क्वचित अस घडत. कारण आहे मोबाईल, सोशल मिडियाचा अतिवापर.

परवा नाशिकला छोट्या तीव्रतेचा भूकंप झाला म्हणून चौकशी करायला आमच्या ह्यांनी म्हणजे गिरीशजींनी त्यांच्या नाशिकच्या मावस भावाला फोन केला. राजाभाऊंना अतिशय आनंद झाला. ते म्हणाले,



हल्ली कोणाशी बोलणं होत नाही किंवा फोनवर बोलणं ही होत नाही. फार छान वाटलं गिरीश तुझ्याशी बोलणं झालं. ख्याली खुशाली कळाली. मन भरून आलं.




मी रोज आईला फोन करत असते, आणि गप्पा मारत असते. एखाद्या दिवशी नाही बोलणं झालं तर तिला एकटं वाटतं. ती म्हणते, आजकाल सगळे कुठे हरवले असतात? कळतच नाही. कुणी बोलायलाच सापडत नाही. आईच वय ऐंशी असल्याने तिला वरच्या मजल्यावरून खाली उतरणे शक्य होत नाही. त्यात कुणी बोलायला नाही. कंटाळून जाते. माझ्याशी तर फोनवर बोलतेच पण इतर नातेवाईकांशी फोन करून ख्याली खुशाली विचारते. गप्पा मारते. तेवढाच वेळ जातो. नाहीतर हल्ली बोलायला कुणाला वेळ आहे? जो तो आपआपल्या कामात व्यस्त!

माझ्या मिस्टरांना बोलायची फार आवड आहे. त्यांना मित्र ही भरपूर आहेत. त्यांना करमत नाही असे कधी होत नाही. अगदी ट्रेनमधे सुद्धा काहीतरी विषय काढून समोरच्याला बोलतं करतात, आणि जाताना ते गृहस्थ असे ही म्हणून जातात की, तुमच्या मुळे वेळ छान गेला बरं का गिरीशजी... आणि हसतात. संवाद साधणे ही एक कला आहे.

या सर्व उदाहरणावरून एक स्पष्ट होतं की संवाद जेथे आहे तेथे आनंद आहे. जेथे संवाद हरवला आहे तेथे वातावरण नकारात्मक होते.

खरं तर संवाद माणसाची मुलभूत गरज आहे.संवाद हा मानवी जीवनाचा गाभा आहे. मानवी जीवनात सुविचारांची देवाण घेवाण व्हायला हवी,भावनांना वाट मिळायला हवी. भावना मनातच राहिल्या तर मानसिक आजार, विकृती निर्माण व्हायला वेळ लागणार नाही.संवादाचा अभाव असणं म्हणजेच संवेदनशीलतेचा अभाव.

आजकाल मित्र, कुटुंबीय प्रत्यक्ष संवाद साधण्या ऐवजी फेसबुक वॉट्सअप, इंस्टाग्राम या सारख्या विविध सोशल मिडिया प्लॅटफॉर्म वरच बोलतात. प्रत्यक्ष बसून छंदावर चर्चा करणे, निवांत गप्पा मारणे, आवडीच्या विषयावर दिलखुलास बोलणे हे सगळं दुर्मिळ झालं आहे. नातेवाईकांच्या, मित्रांच्या सहवासात मिळणारी मायेची ऊब किती ऊर्जा देणारी असते ? याची अनुभूती जुन्या पिढीने घेतलेली आहे.

**(क्रमशः)**

# व्हिएन्ना : सम्राटांचे शहर (भाग अकरावा)

**ज्योतिर्मय साहित्य**

साल्झबर्गहून व्हिएन्नाला जाणारा रेल्वेप्रवासही तितकाच रमणीय होता. पण आता खिडकीबाहेरचे डोंगर मागे पडून हळूहळू विस्तीर्ण मैदाने, द्राक्षांचे मळे आणि टुमदार गावे दिसू लागली. काही तासांतच आम्ही ऑस्ट्रियाच्या राजधानीत, व्हिएन्नामध्ये पोहोचलो. साल्झबर्ग जर एखादे नाजूक, स्वप्नाळू गाणे असेल, तर व्हिएन्ना म्हणजे भव्य, राजेशाही सिंफनी.



व्हिएन्नाचा पहिला थांबा होता शॉनब्रुन पॅलेस हॅब्सबर्ग सम्राटांचा उन्हाळी राजवाडा. तब्बल चौदाशेहून अधिक दालने असलेली ही पिवळीधमक भव्य वास्तू, आणि तिच्यामागे पसरलेली अफाट, नीटनेटकी बाग. आत सोन्याचे नक्षीकाम, झुंबरे, आणि तत्कालीन राजघराण्याचे वैभव पाहून डोळे दिपून गेले. याच राजवाड्यात लहानगा मोझार्ट वयाच्या सहाव्या वर्षी सम्राज्ञी मारिया थेरेसासमोर संगीत वाजवायला आला होता, ही आठवण तिथे आजही सांगितली जाते. बागेच्या टोकावरच्या ग्लोरिएट या सज्ज्यावरून संपूर्ण राजवाडा आणि शहर एका नजरेत दिसते.




तिथून आम्ही आलो शहराच्या मध्यभागी, आणि समोर उभा राहिला सेंट स्टीफन्स कॅथेड्रल व्हिएन्नाचे प्रतीक. गॉथिक शैलीतला त्याचा उंच, निमुळता मनोरा आकाशाला भिडलेला, आणि छतावर रंगीत कौलांची सुंदर नक्षी. हे कॅथेड्रल शहराच्या अगदी हृदयस्थानी आहे, आणि त्याच्याभोवती नेहमीच जिवंत गजबज असते.

व्हिएन्ना म्हणजे राजवैभवासोबतच संगीताचीही राजधानी. मोझार्ट, बीथोव्हन, स्ट्राउस या दिग्गजांनी याच शहरात आपले सूर रचले. भव्य व्हिएन्ना ऑपेरा हाऊसच्या समोरून जाताना त्या संगीतमय वारशाची जाणीव पावलोपावली होत होती. शहराभोवती वळण घेणाऱ्या रिंगश्ट्रासे या रुंद रस्त्यावरून फिरताना दोन्ही बाजूंच्या भव्य, ऐतिहासिक इमारती, संसद, टाऊन हॉल, संग्रहालये एखाद्या खुल्या संग्रहालयातून फिरल्यासारखे वाटत होते. दुपारी आम्ही व्हिएन्नाच्या प्रसिद्ध कॉफी हाऊस संस्कृतीचा अनुभव घेतला. इथली जुनी, ऐटबाज कॉफी हाऊसेस म्हणजे नुसती हॉटेले नाहीत, तर शतकांची परंपरा. संगमरवरी टेबले, मखमली खुर्च्या, आणि तिथली खास साखरटोर्ट चॉकलेटचा एक अप्रतिम केक. गरमागरम कॉफीसोबत तो केक खाताना व्हिएन्नाच्या निवांत, रुबाबदार जीवनशैलीचा खरा स्वाद जिभेवर उतरला. संध्याकाळी आम्ही गेलो प्रटर या जुन्या मनोरंजन उद्यानात. इथले शंभरहून अधिक वर्षे जुने अवाढव्य जायंट व्हील व्हिएन्नाची एक ओळखच बनले आहे. त्यावर बसून वर पोहोचलो, आणि खाली दिवे लखलखणारे संपूर्ण व्हिएन्ना शहर नजरेत सामावले. मावळतीच्या आकाशात हळूहळू लुकलुकणारे दिवे आणि दूरवर पसरलेले हे भव्य शहर, या प्रवासाचा एक अविस्मरणीय शेवट.

# आकड्यांचे मायाजाल : जगणं मोजायचं की अनुभवायचं?

**ज्योतिर्मय साहित्य**

(मागील अंकावरून)

त्याची किंमत त्याच्याकडे किती आकडे आहेत यावर नसते; तर तो कोणत्या मूल्यांच्या बाजूला उभा आहे यावर असते.

भगवद्गीतेत भगवान श्रीकृष्ण अर्जुनाला सांगतात

''कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन.''

म्हणजेच

कर्म कर; पण फळाच्या हिशेबात अडकू नकोस.

किती विलक्षण योगायोग आहे!

दोन हजार वर्षांपूर्वी सांगितलेलं हे तत्त्वज्ञान आजच्या आकड्यांच्या युगात पूर्वीपेक्षा अधिक खरं वाटतं.



कारण आज आपण कर्मापेक्षा मोजतो...

प्रयत्नांपेक्षा परसेन्टेज ...

माणसापेक्षा नेट वर्थ ...

आणि आनंदापेक्षा फालोवर्स.

लेखाचा शेवट एका प्रश्नानेच करूया.

कल्पना करा...

जर उद्या सकाळी जगातील सगळी घड्याळं थांबली...

मोबाईलवरचे सगळे आकडे नाहीसे झाले...

बँक खात्यातील शिल्लक दिसेनाशी झाली...

सोशल मीडियावरील लाइक्स, फॉलोअर्स, रँकिंग, पगार, गुण, पदवी... सगळे आकडे एका क्षणात पुसले गेले... तर उरेल तेच तुमचं खरं आयुष्य.




उरतील तुमची माणसं, उरतील तुमच्या आठवणी. उरेल तुमचं प्रेम, उरेल तुमचं हसू. उरेल तुमचं कर्म. आणि उरेल तुमचा माणूसपणा. बाकी सगळे आकडे... एका क्षणात शून्य होतील. म्हणूनच शेवटी इतकंच आकडे मोजण्यासाठी असतात; आयुष्य जगण्यासाठी. आणि जगण्याचा खरा हिशेब कधीच आकड्यांत मांडता येत नाही.

स्मशानातून परतताना मी एक गोष्ट पाहिली. सरण विझलं होतं. राख उरली होती. त्या राखेत मला कुठेच पगार दिसला नाही, पदवी दिसली नाही, बँक बॅलन्स दिसला नाही, फॉलोअर्स दिसले नाहीत. फक्त राख होती... आणि तिचा रंग प्रत्येकासाठी सारखाच होता. तेव्हा पहिल्यांदाच जाणवलं – शेवटी प्रत्येक आकड्याची बेरीज शून्यच असते.

# माणूसकीचे असावे अवधान

**ज्योतिर्मय साहित्य**

(मागील अंकावरून)

माणुसकी खऱ्या अर्थानी निभावण्याची असल्यास सेवा हीच साधना, सहकार्य हीच पूजा, प्रेम हाच प्रसाद, हे अंतर्मनात जागृत ठेवून जपले । पाहिजे. असे संतांनी वेळो वेळी बजावले आहे. जसे पंढरपूर वारी मध्ये सामिल होवून शेवट पर्यंत जाणारा वारकरी आपल्या प्रवासात माणुसकीचे अनेक धडे गिरवत असतो आणि माणुसकी पर्यंत पोहचण्याची ।वाट घट्ट करून त्याच वाटेने चालण्याचे ध्येय ठेवून आत्म समाधान प्राप्त करीत असतो कारण त्या वारीला माणुसकीचा स्पर्ष होवून जीवनात श्र्द्धा समता, सेवा, शिस्त, परस्पर प्रेमभावना, आत्मीयता, मदतीचा हात . विश्वास, ह्या मुल्यांचे जतन केले जाते त्यामुळे माणूस माणसाला जोडला जातो कारण एकत्र चालणे, एकत्र जेवणे, एकत्र भजन पूजन करणे, एकत्र राहणे, सुख दु:खाचे एकत्र संवाद साधने, संसारातील संकटे विसरणे, अन् परमेश्वर शक्तीशी एकरूपता साधने, संयमी मनाने षड्रिपु पासून सुटका करून घेणे, ह्या माणुसकीच्या बिजा चे बिजांकूर तेथे होत असते.



जेव्हा माणसाच्या मनातील अहंकार, भेदभाव वृत्ती, अपेक्षा स्वार्थ, पूर्णपणे निघून जातो किंवा त्याचा निचरा होतो तेव्हा मनात माणुसकी आपोआप निर्माण होते. मन सात्विक विचारांच्या मोहात अडकून माणुसकी जपण्या साठी प्राधान्य देतो . सत्य रूपाने आत्म जागृती होते तेथेच माणुसकीचा निवास असतो असे संतानी सांगितले आहेच पण त्याचे व्यवहारात अनुकरण करणे गरजेचे आहे नसता नुसता अध:पतन होण्या करता कारण ठरणारा असतो.




नुकताच माणुसकीचे मन जागृत असणारा प्रकार घडला .आहे महाराष्ट्राचे लोकप्रीय मुख्यमंत्री महोदय पंढरपूर येथे विठ्ठल पुजा करण्या साठी, दर्शनासाठी गेले होते त्याचदरम्यान तेथील एका वारकरी भक्तास हृदय विकाराचा तीव्र झटका आला ही बाब मा. मुख्यमंत्री महोदयाना समजल्या बरोबर त्यांनी प्रसंगावधान राखून निर्णय घेवून सुत्रे हलविले त्या वारकरी भक्ताला तात्काळ हेलिकॉप्टर सेवा उपलब्ध करून १५ ते २० मिनिट मध्ये सोलापूर येथील रुग्णालयात पोंहचविले त्याला वेळेत वैद्यकीय मदत मिळाली अन् त्याचे प्राण वाचले. हा माणूसकी जीवंत असल्याचा एक आदर्श नमुना आपल्या समोर आहे.

त्याच प्रमाणे २ रे उदाहरण आपल्या समोर मांडताना मला आनंद होतो. साहित्याचा विकास व्हावा, वाचन, लिखाण, संस्कृतीला गती मिळावी नवोदित लेखक – कवी याना व्यासपीठ मिळावे म्हणून निस्वार्थ वृत्तीने सेवा देणारे ज्योतिर्मय दैनिकाचे संपादक श्री संजयजी व्यापारी, ह्यांचे कार्य माणुसकी जपण्याचे उदाहरण आहे,

त्यांचे सहर्ष अभिनंदन मला मनातून वाटते त्यांचा हा आदर्श आपण लोकाभिमुख करणे गरजेचे आहे . नवोदित कवी लेखकाला कोण सहजतेने असे निरपेक्ष व्यासपीठ देण्यास मोकळा आहे. ?

मग आपणही एखादे माणुसकी जपण्याचे उदाहरण घडवायला काय हरकत आहे ? असे उदाहरण घडवून हा माणूसकी जपण्याचा संदेश सर्वा पर्यंत पोंहचवण्या करिता मदत करावी. एव्हडेच !

***

# ऋतू हिरवा, ऋतू बरवा



डॉ. मीना श्रीवास्तव मो. 99201 67211



पुढे....

या मनोहर हिरवाईने लगडलेल्या, रंगीबेरंगी सुमनांच्या ताटव्याने बहरलेल्या वर्षाऋतूचा देखणा नायक असतो 'पाऊस'! मराठी माणसाच्या मनांमनांत रुजलेले हिरवेजर्द काव्य म्हणजे बालकवी (त्र्यंबक बापूजी ठोंबरे) यांचे 'बालभारती' त प्रस्थापित 'श्रावणमासी हर्ष मानसी, हिरवळ दाटे चोहिकडे । क्षणात येते सरसर शिरवे क्षणात फिरूनी ऊन पडे ।।' ही आद्य पाऊस कविता! कितीही वेळा वाचा, हिची सर्वकालीन हिरवीकंच हिरवाई कधीच कोमेजत नाही. या बहुप्रसवी भूमीचे सृजन याच पावसाने फुलते.

उन्हाने त्रासलेल्या मानवाला तर हा पाऊस म्हणजे आनंदच नव्हे तर नवसंजीवनी देणारा ठरतो. म्हणून तर पावसाळा हा 'ऋतू हिरवा ऋतू बरवा' (कवयित्री-शांताबाई शेळके) आहे.

'ऋतू हिरवा, ऋतू बरवा,
पाचूचा वनी रुजवा
युगविरही हृदयावर, सरसरतो मधूशिरवा'

लहान मुलांची (त्यांच्या लहानपणापासूनच) अन पावसाची गट्टी अश्शी घनदाट असते, की 'ये रे ये रे पावसा रुसलास का माझ्याशी गट्टीफू केलीस का' (कवयित्री-वंदना विटणकर) असे ती त्यालाच विचारतात. उत्तर मिळाले नाही तर मग ही मुले पाऊसदादाला सरळ एका ढब्बू पैशाचे आमिष द्यायलाही कमी करत नाहीत. म्हणून तर अखिल बालक मंडळी पहिल्या पावसाची एंट्री व्हावी म्हणून 'ये रे येरे पावसा तुला देतो पैसा', असे घोकत असतात. गोड छकुल्याने असा पैसा दिला की, गहिवरलेला आज्ञाधारक पाऊस लगेच हजर झालाच म्हणून समजा!

आता बाळ थोडं मोठं झालं की त्याला अवचितच शाळा नामक खलनायिका भेटते. मग काय आता कवितेचा रागरंगच बदलतो. 'सांग सांग भोलानाथ पाऊस पडेल काय, शाळेभोवती तळे साचून सुट्टी मिळेल काय?' (कवी-मंगेश पाडगावकर) असे म्हणत शाळेला वैतागलेली पोरं मग डायरेक्टली भोळ्या शंकरालाच साकडे घालतात. बघा कशी गंमत आहे, धो धो पाऊस अंगणात अन रानावनात कोसळतोय अन ही आई नावाची बाई मुलाला घरात कोंडून ठेवतेय!

(क्रमश:)

# युरोप दर्शन



वामन वा. कोठेकर
मोबाईल : +91 98606 99972

पुढे.....

ठरल्याप्रमाणे आम्ही ८मे रोजी सकाळी ६ वाजता एअरपोर्ट वर पोचलो टूर मॅनेजर अक्षयची तिथे भेट झाली. आमच्या बॅग्स चेक इन करून आम्ही बोर्डिंग पास घेऊन सिक्युरिटी चेक आणि इमिग्रेशन पूर्ण करून बोर्डिंग गेट ला आलो. टूर मधील बाकी लोक देखील हळूहळू येत होते आमची अद्याप ओळख झाली नव्हती. आम्ही थोड्याच वेळात फ्लाईट बोर्ड केली आणि आमच्या टूर ला सुरुवात झाली. ही लंडन मधील गॅटविक एअरपोर्टला जाणारी फ्लाईट होती. आमचेसाठी इंडियन व्हेजिटेरियन जेवण फ्लाईट मध्ये ऑर्डर केलेलं होत.

♦ यू के (ग्रेट ब्रिटन )

यु के अर्थात इंग्लंड बघण्याची उत्सुकता होतीच कारण भारतावर दीडशे वर्ष राज्य करणाऱ्या साम्राज्यवाद्यांचा हा देश कसा आहे हे पाहायचे होते. आपल्या देशाच्या स्वातंत्र्य संग्रामात प्राणांची आहुती देणाऱ्या वीरांना फासावर लटकावणाऱ्या आणि अनेक क्रांतिकारकांना तुरुंगात डांबणाऱ्या इंग्रजांचा हा देश आहे तो तर बघितलाच पाहिजे असे विचार मनात येत होते. अखेर आमचे विमान युरोपात लंडनला लँड झाले आणि युरोप टूर ला सुरवात झाली.

♦ लंडन

आम्ही रात्री १० वाजता लंडन येथे गॅटविक एअरपोर्ट वर पोचलो. अक्षयने आम्हा सर्वांना हॉटेल पर्यंत जाण्यासाठी लक्झरीबस अरेंज करून ठेवली होती त्यामध्ये बसून आम्ही हॉटेलला पोचलो. तिथे डिनर करून रूम चेक इन केले आणि दिवसभर प्रवास झाल्याने आराम केला.

दुसरे दिवशी लोकल लंडन पहायचे होते सकाळी आम्ही लंडन ब्रीज ला गेलो अनेक चित्रपटांमध्ये बघितलेला प्रसिद्ध लंडन ब्रीज प्रत्यक्ष पाहिला.तिथे काही फोटो काढून आम्ही टॉवर ऑफ लंडन म्युझियम बघायला गेलो. अनेक ऐतिहासिक वस्तू,राजमुकुट, तिथे होती जगप्रसिद्ध असा भारतातील कोहिनूर हिरा पाहण्याची संधी तिथे मिळाली . तेथून मग आम्ही बँकिंगहॅम पॅलेस बघायला गेलो. ब्रिटिश राजघराण्याचे हे निवासस्थान. तेथील राजघराण्याचा ध्वज त्याची साक्ष देत होता.सुरक्षा व्यवस्था चोख होतीच पण राष्ट्रीय स्मारक म्हणून टुरिस्ट ची गर्दी होती. ब्रिटिश पार्लमेंट बाहेरूनच बघून वाटेत लंच करून आम्ही मादाम तूसा म्युझियम येथे आलो.आमच्यासाठी अमेरिकेनंतर दुसऱ्यांदा असे म्युझियम आम्ही बघत होतो अर्थात हे लंडन चे म्युझियम होते. राणी व्हिक्टोरिया, प्रिन्स चार्ल्स आणि डायना, विन्स्टन चर्चिल, अनेक शास्त्रज्ञ अशा अनेक मोठ्या लोकांचे स्टाच्यू तिथे होते.तेथून आम्ही लंडन आय ची राईड करण्यासाठी गेलो. लंडन आय हा थेम्स नदीच्या काठावर उभारलेला प्रचंड मोठा टॅब्लेट आकाराचे पाळणे असलेला इलेक्ट्रिक रहाट पाळणा आहे याच्या एका टॅब्लेट मध्ये तीस ते चाळीस लोक बसू शकतात. हा टॅब्लेट वर गेल्यावर काचेतून आपण संपूर्ण लंडन शहर बघू शकतो एवढी उंची त्याची आहे म्हणूनच त्याला लंडन आय म्हणत असावेत. तेथून आम्ही परत हॉटेलकडे आलो. डिनर आटोपून रूममध्ये जाऊन दुसऱ्या दिवशीची तयारी करून झोपलो. दुसरे दिवशी सकाळी सात वाजता आम्हाला पॅरिस साठी निघायचे होते.

क्रमशः

# 'शहीदांची पत्रे'च्या भावस्पर्शी सादरीकरणातून स्वातंत्र्यवीरांच्या त्यागाला उजाळा

**ज्योतिर्मय साहित्य**




छत्रपती संभाजीनगर – बलवंत वाचनालयाच्या १०७ व्या वर्धापन दिनानिमित्त 'सुधीर मोघे प्रस्तुत – शहीदांची पत्रे' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन शनिवार, दि. १ ऑगस्ट २०२६

रोजी विजेंद्र काबरा स्मृती सभागृहात करण्यात आले. भगतसिंग, शिवराम हरी राजगुरू आणि सुखदेव थापर या महान क्रांतिकारकांच्या जीवनातील देशप्रेम, त्याग, क्रांतिकारी विचार आणि स्वातंत्र्याची जाज्वल्य भावना त्यांच्या पत्रांच्या माध्यमातून प्रभावीपणे रसिकांसमोर सादर करण्यात आली.

या कार्यक्रमाचे सादरीकरण सुधीर मोघे, अरविंद देशपांडे आणि संजय गंगाखेडकर यांनी केले. शहीदांच्या पत्रांमधील भावविश्व, क्रांतिकारी विचार आणि मातृभूमीसाठी सर्वस्व अर्पण करण्याची त्यांची मानसिकता या सादरीकरणातून अत्यंत प्रभावीपणे उलगडण्यात आली.

भगतसिंग यांच्या पत्रांमधून देशाच्या स्वातंत्र्याची तीव्र तळमळ, क्रांतीची विचारधारा आणि देशासाठी बलिदान देण्याची त्यांची तयारी प्रकर्षाने जाणवते. अन्यायाविरुद्ध निर्भयपणे उभे राहण्याचा आणि देशहिताला सर्वोच्च स्थान देण्याचा संदेश त्यांच्या विचारांतून मिळतो. शिवराम हरी राजगुरू यांच्या जीवनातून मातृभूमीप्रती असलेली निष्ठा, स्वातंत्र्याची आस आणि देशासाठी हसत हसत बलिदान देण्याची भावना प्रकट होते. तर सुखदेव थापर यांच्या विचारांत क्रांतिकारी विचारांची स्पष्टता, संघटनशीलता आणि देशाच्या स्वातंत्र्यासाठी जीवन अर्पण करण्याची दृढता दिसून येते.

कार्यक्रमाच्या प्रस्तावनेत डॉ. रविंद्र झवर यांनी बलवंत वाचनालयाच्या ऐतिहासिक वाटचालीचा आढावा घेतला. लोकमान्य टिळकांच्या स्मृतिदिनी, दि. १ ऑगस्ट १९२० रोजी बलवंत वाचनालयाची स्थापना झाल्याचे त्यांनी सांगितले. गेल्या १०७ वर्षांच्या प्रदीर्घ वाटचालीत बलवंत वाचनालयाने वाचनसंस्कृती जोपासण्याबरोबरच ज्ञानप्रसाराचे महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. आज हे वाचनालय सुमारे ८० हजारांहून अधिक ग्रंथसंपदेने समृद्ध असून, शहरातील वाचक आणि अभ्यासकांसाठी ज्ञानाचे महत्त्वपूर्ण केंद्र म्हणून कार्यरत आहे.

बलवंत वाचनालयाच्या कार्यकारी मंडळाच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बलवंत वाचनालयाचे अध्यक्ष श्री. बिपीनकुमार बाकलीवाल होते. प्रमुख पाहुण्यांचे स्वागत दिलीप सारडा, डॉ. उज्वला झवर आणि डॉ. सुभाष झवर यांनी केले.

यावेळी महापौर समीर राजूरकर, डॉ. कल्पना झवर, चिटणीस रंजना सारडा, डॉ. सचिन झवर, हेमंतकुमार बाकलीवाल, प्रितीदेवी बाकलीवाल यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बी. डी. सुरवसे यांनी केले, तर आभार प्रदर्शन विठ्ठलराव कदम यांनी केले.शोभा घाडगे,आम्रपाली पगारे, लता पराते, एस. जी. गायकवाड, राजश्री शिरसाठ, अनुसूजा देमे, आदीनी विशेष परिश्रम घेतले.

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी–चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559